राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ मिळण्याकरीता भटके विमुक्त समूह दाखला मेळावे आयोजित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**

५, मोती महल, दुसरा मजला, १९५, टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

शासन परिपत्रक क्रमांक: बैठक-२०२६/ प्र.क्र.३५/ मावक

दिनांक:- ०७/०८/२०२६

**वाचा:-** शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१४८/मावक, दिनांक २८ ऑगस्ट, २०२५.

**प्रस्तावना:-**

राज्य शासनामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या कल्याणासाठी विविध योजना लागू करण्यात आल्या आहेत. १८७१ साली ब्रिटिश सरकारने Criminal Tribes Act अंतर्गत काही जमातींना गुन्हेगार म्हणून जाहीर केले. स्वातंत्र्यानंतर १९५२ साली हा कायदा रद्द करण्यात आला आणि या जातींना "विमुक्त जाती" (म्हणजे मुक्त झालेल्या) म्हणून घोषित करण्यात आले. भटक्या जमाती (Nomadic Tribes) म्हणजे अशा समाजघटकांचा समूह की जे पारंपरिक पद्धतीने एकाच ठिकाणी न राहता फिरत्या स्वरुपात आपला उदरनिर्वाह करत असतात. महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची संख्या लक्षणीय असून, त्यांच्या भटक्या जीवनशैलीमुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

२. विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार व शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली ओळखपत्रे, शासकीय प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबतच्या कार्यपध्दतीमध्ये सुलभता आणण्याच्या प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाच्या दि. २६/०८/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे.

३. त्यानुषंगाने विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार व शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली ओळखपत्रे, शासकीय प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळण्याच्या कार्यपध्दतीमध्ये संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सुलभता आणण्यात आलेली आहे.

४. सदर कार्यपद्धती अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे देणे तसेच विविध योजनांचा लाभ देण्यासाठी महसूल विभाग, योजनेशी संबंधित असलेला विभाग आणि संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांनी संयुक्तपणे मंडळ/ तालुका स्तरावर शिबीरांचे आयोजन करावयाचे आहे. तसेच, सदर सुलभ कार्यपद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या स्थापन करणे, सदर समित्यांमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या

कल्याणाकरीता काम करणारे अशासकीय सदस्यांची नेमणूक करणे, भटके विमुक्त कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, विदर्भ प्रांत आणि भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, सोलापूर या संस्थांशी सामंजस्य करार करणे इत्यादी उपाययोजना शासनामार्फत करण्यात आलेल्या आहेत.

**५.** आता, उपरोक्त उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तालुका/ मंडळ स्तरावर आयोजित करावयाच्या शिबिरांच्या (भटके विमुक्त समूह दाखला मेळावे) आयोजनात सुसुत्रता आणून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ तात्काळ मिळण्याकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

१) राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना द्यावयाची विविध ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याकरीता उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार/ कार्यपद्धतीनुसार महसूल विभाग, योजनेशी संबंधित असलेला विभाग आणि संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांनी संयुक्तपणे राज्यभरात एकाच दिवशी शिबिरांचे आयोजन करावे.

२) सदर शिबिरांना अधिकृतपणे "भटके विमुक्त समूह दाखला मेळावा" असे नाव देण्यात यावे.

३) राज्यामध्ये मंडळ अधिकारी कार्यालयांची एकूण संख्या २६२५ इतकी आहे. यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर दिनांक ०६/१०/२०२६ रोजी पासून प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या मंगळवारी एक "भटके विमुक्त समूह दाखला मेळावा" याप्रमाणे वर्षामध्ये एकूण ०४ भटके विमुक्त समूह दाखला मेळावे (उदाहरणार्थ दिनांक ०६/१०/२०२६, दिनांक ०५/०१/२०२७, दिनांक ०६/०४/२०२७ व दिनांक ०६/०७/२०२७) आयोजित करण्यात यावेत.

४) दिनांक ०६/०७/२०२७ नंतर अशाच कालानुक्रमानुसार प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या मंगळवारी संपूर्ण राज्यभरात एकाच दिवशी भटके विमुक्त समूह दाखला मेळावे आयोजित करण्यात यावेत.

५) भटके विमुक्त समूह दाखला मेळाव्यांमध्ये आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, अधिवास दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र, जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र व अन्य आवश्यक प्रमाणपत्रांबाबत तसेच केंद्र व राज्य शासनाच्या योजनांबाबत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांच्या तक्रारी सत्वर निकालात काढण्यात याव्यात.

६) सदर भटके विमुक्त समूह दाखला मेळाव्यांमध्ये तालुकास्तरीय समितीवरील संबंधित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, मुख्याधिकारी, तहसिलदार तसेच

लाभाशी संबंधित विभागाच्या सक्षम अधिका-यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे सदर मेळाव्यांना मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, पोलीस पाटील, कृषी सहायक, अंगणवाडी सेवक, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिचारीका यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे बंधनकारक असेल.

७) भटके विमुक्त समूह दाखला मेळाव्यासाठी नियोजित तारखेच्या १५ दिवस अगोदर विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने तालुकानिहाय लाभार्थ्यांची संख्या/ यादी निश्चित करुन मूलभूत ओळखपत्रे/ कागदपत्रे उदा. जन्म दाखला, रहिवासी दाखला, वंशावळ दाखला यांची पूर्तता/ जमवाजमव अगोदरच करण्यात यावी. मेळाव्याच्या प्रत्यक्ष दिवशी नागरिकांच्या आवश्यकतेनुसार योजना व प्रमाणपत्रांसाठी आवश्यक अर्जांचे नमुने भरण्यात यावेत व त्यानंतर त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत (यथास्थिती ३० किंवा ३१ तारीख) मेळावा आयोजित झाल्याच्या ठिकाणीच लाभार्थ्यास शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा/ प्रमाणपत्राचे वाटप करण्यात यावे.

८) संबंधित तहसिलदार यांनी संबंधित सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण व जिल्हा/ तालुकास्तरीय समितीवर नियुक्त अशासकीय सदस्यांच्या मदतीने व सल्ल्याने तालुक्यातील/ मंडळातील मेळाव्यांचे नियोजन, आयोजन व अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी घ्यावी व सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचेशी समन्वय साधून कार्यवाही करावी.

९) सामंजस्य करार केलेल्या भटके विमुक्त कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, विदर्भ प्रांत आणि भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, सोलापूर यांनी केलेल्या वस्ती सर्वेक्षणानुसार सुरुवातीच्या कालावधीत भटके विमुक्त समूहाची लोकसंख्या अधिक असलेल्या राज्यातील २०३ तालुक्यातील/ वस्त्यांमध्ये (परिशिष्ट-अ नुसार) भटके विमुक्त समूह दाखला मेळावे आयोजित करण्यात यावेत. तद्‌नंतर संपूर्ण राज्यातील सर्व तालुके/ मंडळे येथे भटके विमुक्त समूह दाखला मेळावे आयोजित करण्यात यावेत.

१०) संबंधित जिल्हाधिकारी यांनी भटके विमुक्त समूह दाखला मेळाव्यांच्या तारखांची व उद्देशांची आगाऊ प्रसिद्धी द्यावी आणि सर्व जिल्हास्तरीय विभागांना मेळाव्याच्या प्रभावी अंमलबजावणी करीता सहभागी होणेबाबत निर्देशित करावे.

११) संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी तालुका/ मंडळ स्तरावर लाभाशी संबंधित सर्व विभागांची जिल्हा/ तालुकास्तरीय समितीवर नियुक्त अशासकीय सदस्यांसोबत समन्वय बैठक घेऊन सर्व विभागांकडे असलेल्या प्रलंबित विषयांची यादी तयार करावी. सर्व विभागाकडील प्रलंबित सेवा/ विषय मेळावा आयोजनाच्या पूर्वी निकाली काढून मेळाव्यात प्रत्यक्ष लाभ उपलब्ध करुन द्यावा. मेळाव्यांचे प्रभावी आयोजन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात यावे.

१२) तालुका/ मंडळ स्तरावर दवंडी, सोशल मिडीया तसेच प्रिंट मिडियाचा वापर करुन मेळाव्याची व्यापक प्रसिद्धी द्यावी. नागरिकांचे अभिप्राय व सूचना प्राप्त करुन घेण्यासाठी मेळाव्याच्या ठिकाणी व्यवस्था करण्यात यावी.

१३) या मेळाव्यांदरम्यान कोणत्याही नागरिकांना त्रास होणार नाही व सर्व सेवा सौजन्याने, पारदर्शकपणे व कार्यक्षमतेने पुरविल्या जातील याची दक्षता घ्यावी.

१४) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी भटके विमुक्त दाखला समूह मेळाव्यांची राज्यव्यापी प्रसिद्धी करावी व मेळाव्यानंतर यशस्वी अंमलबजावणीचा अहवाल प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध करावा.

१५) प्रत्येक तालुका/ मंडळ स्तरावर भटके विमुक्त समूह दाखला मेळावा आयोजित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल तहसिलदारांनी संबंधित जिल्ह्यांचे सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांना सादर करावा व सदर अहवाल सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी संचालनालयामार्फत इतर मागास बहुजन कल्याण विभागास सादर करावा.

२. सदर शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८०७१५२८५१३९३४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VASANT GOPAL MANE

Digitally signed by VASANT GOPAL MANE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OBC Dept, 2.5.4.20=19C1F05A32104713094B1BABBAE721A60140A8F1F9E16CA9D8DC3EAF7DE15D65, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C621B4190E31904B3DEA97E81C85A31BBAAFF04C1ADEA8A8811D74F01DA4E724, cn=VASANT GOPAL MANE
Date: 2026.08.07 15:29:57 +05'30'

**(डॉ. वसंत माने)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**<u>प्रति,</u>**

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२
७. मा विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई-३२
८. सर्व मा. संसद सदस्य/ मा. विधानपरिषद सदस्य/ मा. विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
९. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
११. मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई

१३. मा. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६. सर्व आयुक्त, महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१९. सर्व प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य
२०. सर्व सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य
२१. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
२२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
२३. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
२५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२६. संचालक, समाजकल्याण, पुणे
२७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२८. आयुक्त, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई
२९. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
३०. संचालक-२ तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू महाराष्ट्र राज्य, पुणे
३१. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी
३२. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३३. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
३४. सदस्य सचिव, महराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
३५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
३६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
४०. सर्व तहसिलदार, महाराष्ट्र राज्य
४१. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य
४२. निवड नस्ती, (कार्यासन मावक).

**शासन परिपत्रक क्रमांक: बैठक-२०२६/ प्र. क्र.३५/ मावक, दिनांक: - ०७/०८/२०२६ सोबतचे**

**परिशिष्ट-अ**

**भटके विमुक्त समूहाची लोकसंख्या अधिक असलेल्या राज्यातील २०३ तालुक्यांचा/ वस्त्यांचा तपशील**

| अनु. क्र. | जिल्हा | तालुका नावे | वस्ती संख्या | जिल्हा स्तरावरील अशासकीय सदस्याचे नाव व त्यांचा संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | नाशिक | १२ | १. श्री. विक्रम देविदास लाखलगावकर-९८६०६६७७३७ |
| २. | | निफाड | ४ | २. श्री. संजय बाबुराव सोनवणे-७२४९४६६४३१ |
| ३. | | नांदगाव | १२ | ३. श्री. चंद्रकांत तुळशीराम बगडाणे-८४४६४४४४९१ |
| ४. | | येवला | ४ | ४. श्री. बाळासाहेब रतनदास बैरागी-९४२३१४१६३७ |
| ५. | | सिन्नर | ४ | |
| ६. | | मालेगाव | ३ | |
| ७. | | बागलाण | ४ | |
| ८. | | कळवण | ३ | |
| ९. | | ईगतपुरी | ३ | |
| १०. | अहिल्यानगर | अहिल्यानगर | ३ | १. श्री. भारत यलप्पा फुलमाळी-९६८९९५८५९१ |
| ११. | | शेवगाव | ३ | २. श्री.गोविंदा मारुती कडमींचे-९६८९०३४९४२ |
| १२. | | नेवासा | २ | ३. श्री. मुकेश हिरामण चखाले-८९८३७५२९९१ |
| १३. | | संगमनेर | १ | ४. श्री. समीर अनील काळे-७३५०८०१६९२ |
| १४. | | जामखेड | ३ | |
| १५. | | श्रीगोंदा | २ | |
| १६. | | कर्जत | १ | |
| १७. | | श्रीरामपूर | २ | |
| १८. | | राहाता | २ | |
| १९. | | कोपरगाव | २ | |
| २०. | पुणे | मावळ | ८ | १. श्री. किशोर सखाराम शिंदे-९९२३४२७४३६ |
| २१. | | मुळशी | ६ | २. डॉ.जितेंद्र कृष्णचंद्र ठाकूर-९७६५९९९१८४ |
| २२. | | जुन्नर | ५ | ३. श्री. प्रशांत लक्ष्मणराव सहस्त्रबुद्धे-८८८८६४५९५९ |
| २३. | | पुरंदर | १५ | ४. श्री. अरविंद भिमा देवकर-९६७३३२२७४७ |
| २४. | | हवेली | २० | |
| २५. | | भोर | ५ | |
| २६. | | दौंड | ४ | |
| २७. | | पुणे शहर | १० | |
| २८. | | बारामती | ५ | |
| २९. | | इंदापूर | २ | |
| ३०. | | आंबेगाव | २ | |
| ३१. | कोल्हापूर | शाहुवाडी | ५ | १. श्री. शशांक अपर्णा दामोदर देशपांडे-९८२२८७२६९२ |
| ३२. | | हातकणंगले | ६ | २. श्री. अशोक रेखा शिवाजी लाखे-९०९६४७१०४९ |
| ३३. | | करवीर | ८ | ३. श्री. स्वप्नील इंदूमती संजय निपाणीकर-९७३०१४४८१७ |
| ३४. | | चंदगड | ४ | ४. श्री. किरण इराप्पा गाडीवडार-९९२३७७९५७६ |
| ३५. | | गडहिंग्लज | ४ | |
| ३६. | | शिरोळ | १ | |
| ३७. | सांगली | वाळवा | ५ | १. श्री. तानाजी मारुती पवार-९०९६१३९४९८ |
| ३८. | | शिराळा | ५ | २. श्री. संपतराव नामदेव धनवडे-८४५२०६१३६१ |
| ३९. | | आटपाडी | ३२ | ३. श्री. ओमप्रकाश शिवाजी जाधव-९८६०९१५६२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०. | | मिरज | ५ | ४. श्री. राघवेंद्र गंगाराम चौघुले-८३२९७७५७०० |
| ४१. | | खानापूर | ६ | |
| ४२. | | जत | २ | |
| ४३. | सातारा | सातारा | ६ | १. श्री. शंकर मोतीराम जावळे-८३२९७२४९९० |
| ४४. | | वाई | ६ | २. श्री. प्रशांत राजाराम चव्हाण-९५६१३०५३३३ |
| ४५. | | खंडाळा | ३ | ३. श्री. मोतीराम मारुती चव्हाण-७५५८६२०१५५ |
| ४६. | | कराड | २ | ४. श्री. सुरज प्रविण मदने-९६६५६३१०८३ |
| ४७. | | कोरेगाव | १ | |
| ४८. | सोलापूर | अक्कलकोट | १० | १. श्री.संतोष वसंतराव शिर्के-९८५०१८८९७१ |
| ४९. | | पंढरपूर | ८ | २. श्री. सुनिल तमन्ना पवार-७०२०७७७९६० |
| ५०. | | मंगळवेढा | १ | ३. श्री. निशांत निरंजन परदेशी-७०२०३११३६१ |
| ५१. | | मोहोळ | १३ | ४. श्री. संजय धोंडू राठोड-९७६५१९८८०० |
| ५२. | | सांगोला | २ | |
| ५३. | | उत्तर सोलापूर | ५५ | |
| ५४. | | दक्षिण सोलापूर | ५ | |
| ५५. | | करमाळा | ३ | |
| ५६. | | बार्शी | २ | |
| ५७. | परभणी | मानवत | ७ | १. श्री. हनुमान सिंग कचवे-७३८७८८०३०८ |
| ५८. | | पाथ्री | ४ | २. श्री. लक्ष्मण सखाराम सोनवणे-९९२३०७३२३८ |
| ५९. | | गंगाखेड | ४ | ३. डॉ. केदारसिंग खटींग-९६५७३७०६५४ |
| ६०. | | पालम | १ | ४. श्री. ऋषीकेश साहेबराव सकनुर-९४०३३०३१९७ |
| ६१. | | जिंतुर | १ | |
| ६२. | | परभणी | १७ | |
| ६३. | | पुर्णा | ४ | |
| ६४. | | सेलू | १ | |
| ६५. | | सोनपेठ | १ | |
| ६६. | धाराशिव | धाराशिव | ५ | १. श्री. हनुमंत मुकुंद वाकडे-९५७९२९११३६ |
| ६७. | | भूम | १३ | २. श्री. पप्पु अधीकराव काळे-७६६६०६७४२८ |
| ६८. | | वाशी | ३ | ३. श्रीम. मिरा दत्तात्रय मोटे-९९२१३२८२०९ |
| ६९. | | कळंब | ५ | ४. श्री. राम धोंडीराम जवान-९६०४०४८०५७ |
| ७०. | | परांडा | ५ | |
| ७१. | | तुळजापूर | १४ | |
| ७२. | | उमरगा | ३ | |
| ७३. | जळगाव | एरंडोल | २ | १. श्री. प्रविण उत्तम सुर्यवंशी-९७६६३५४५३७ |
| ७४. | | धरणगाव | ८ | २. श्री. विकास विठ्ठल माळुकर-९५६१७२६१४० |
| ७५. | | जळगाव | ४ | ३. श्री. अशोका भोजू पाथरवट-९८२३६७२२९९ |
| ७६. | | पाचोरा | ६ | ४. श्री. फकीरा पंडीत भोई-८७६६९४५४८० |
| ७७. | | यावल | २ | |
| ७८. | | भुसावळ | २ | |
| ७९. | | भडगाव | २ | |
| ८०. | | मुक्ताईनगर | २ | |
| ८१. | | चोपडा | २ | |
| ८२. | | जामनेर | २ | |
| ८३. | | चाळीसगाव | ३ | |
| ८४. | | अमळनेर | २ | |
| ८५. | छ.संभाजीनगर | छ.संभाजीनगर | ४ | १. श्री. दत्तात्रय गंगाराम दंडवलकर-९४२१४९०६७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८६. | | सिल्लोड | २ | २. श्री. गणेश कोंडीराम काळे-९८८१८६६५७६ |
| ८७. | | वैजापूर | २ | ३. श्री. संतोष नागनाथराव केंद्रे-८४२२२१४६३३ |
| ८८. | | फुलंब्री | २ | ४. श्री. सर्जेराव नारायण वाघ-९४२२२३३२२८ |
| ८९. | | कन्नड | २ | |
| ९०. | | गंगापूर | २ | |
| ९१. | बीड | वडवणी | ४ | १. श्री. उमेश ज्योतीनाथ जोगी-९५११८६९६५१ |
| ९२. | | बीड | ११ | २. श्री. ओमप्रकाश सदानंद गिरी-९५११६६८१४१ |
| ९३. | | धारूर | २ | ३. श्री. भगवान फकीरा पवार-९८२३१९२१९६ |
| ९४. | | परळी | २ | ४. श्री. बालाजी नरसु पवार-९२६०००७००० |
| ९५. | | शिरुर | २ | |
| ९६. | | गेवराई | १० | |
| ९७. | | माजलगाव | ७ | |
| ९८. | | आष्टी | ४ | |
| ९९. | धुळे | धुळे | ५ | १. श्री. उखडू भिला कोळपे-७६२०४२३३२० |
| १००. | | साक्री | ४ | २. श्री. दीपक भीमराव बाबर-७७७४९३२१२३ |
| १०१. | | शिरपुर | २ | ३. श्री. लखन सुखदेव शिंदे-८७८८०६७३१० |
| १०२. | | शिंदखेडा | २ | ४. श्री. धीरज भिका धनगर-८७८८२७६८९१ |
| १०३. | नंदुरबार | शहादा | ४ | १. श्री. विठ्ठल चैत्राम पथारीया-९५११७४४६४२ |
| १०४. | | नंदुरबार | १० | २. श्री. धनराज आनंद कातोरे-९४२३९४२४१२ |
| | | | | ३. श्री. बाळु राजु ठेलारी-९५११७१६१९१ |
| | | | | ४. श्री. छगन सुका पिसाळ-७०३८६७३८६६ |
| १०५. | हिंगोली | हिंगोली | ९ | १. डॉ. सुर्यकांत उद्धवराव भोसले-९८८१९८५२९० |
| १०६. | | औंढा नागनाथ | ९ | २. श्री. ज्ञानेश्वर गणपत विसलकर-७८७५६९६९५९ |
| १०७. | | सेनगाव | १३ | ३. श्री. ज्ञानेश्वर शिवाजी सातपुते-९५५२८९०२४५ |
| १०८. | | वसमत | ११ | ४. श्री. नारायण शेषराव बाबर-९५२९४०७४७८ |
| १०९. | जालना | जाफराबाद | ६ | १. श्री. विकास गुलाबराव राठोड-८८८८२०९६८० |
| ११०. | | भोकरदन | ५ | २. श्री. विष्णु नारायण गिरी-९६५७६४११४४ |
| १११. | | अंबड | २ | ३. श्री. दुष्यंत छबुराव इघारे-७०२०३१८०४४ |
| ११२. | | बदनापूर | ४ | ४. श्री. मुकुंद डुमलसिंग भारव्दाज-९९२१६७५८०० |
| ११३. | | परतूर | २ | |
| ११४. | | घनसांगवी | १३ | |
| ११५. | | जालना | २ | |
| ११६. | | मंठा | १ | |
| ११७. | लातुर | औसा | २ | १. श्री. हरिष प्रताप काळे-९०९६५०२४४२ |
| ११८. | | निलंगा | ९ | २. श्री. सुधाकरराव रामराव कुलकर्णी-९४२९४१४८४८ |
| ११९. | | लातुर | ५ | ३. श्री. धनराज रावसाहेब गिते-९६२३१९१९९९ |
| १२०. | | शिरुर अनंतपाळ | ३ | ४. श्री. तायप्पा मशाप्पा चव्हाण-९७६४१०७९९९ |
| १२१. | | चाकूर | ३ | |
| १२२. | | देवनी | ३ | |
| १२३. | | उदगीर | ३ | |
| १२४. | | रेणापूर | ३ | |
| १२५. | | अहमदपूर | ५ | |
| १२६. | नागपूर | उमरेड | १३ | १. डॉ. रोहीत भैय्याजी माडेवार-९०४९९४७९९९ |
| १२७. | | कुही | ४ | २. श्री. महेंद्र भीमराव गोबाडे-९१५८७०१९१८ |
| १२८. | | कळमेश्वर | ४ | ३. श्री. प्रवीण बाबा जगताप-९५११७७९२३५ |
| १२९. | | नागपूर (शहर) | ४ | ४. श्री. रुपेश भाऊसाहेब पवार-९७६५९२४७४८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३०. | | पारशिवनी | १ | |
| १३१. | | नारखेड | १ | |
| १३२. | | सावनेर | ३ | |
| १३३. | | हिंगणा | २ | |
| १३४. | भंडारा | भंडारा | ८ | १. श्री. श्रीकांत भास्कर तिजारे-७०३८८३९७६२ |
| १३५. | | साकोली | ६ | २. श्री. शिवा छन्नू कांबळे-७५०७१६२५२६ |
| १३६. | | लाखनी | २ | ३. श्री. राहुल गंगाराम आवरकर-८०१०९०६७९२ |
| १३७. | | तुमसर | २ | ४. श्री. शरद नकुल सोनकुसरे-८३९०३८२७९७ |
| १३८. | | मोहाडी | १ | |
| १३९. | गोंदिया | गोंदिया | २ | १. श्रीम. उर्मिला प्रशांत बोरसे-९३५६२१३८०० |
| १४०. | | आमगाव | २ | २. श्री. आदित्य अनिल वाघमारे-८५५४९५३४६६ |
| १४१. | | गोरेगाव | २ | ३. श्री. संतोष कुमार सोरते-७०६६७६७११५ |
| १४२. | | तिरोडा | २ | ४. श्री. नानेश्वर ध्रुव उमे-९३२५७६३७४६ |
| १४३. | वर्धा | वर्धा | ४ | १. श्री. अंकुश अंबादास एकनार-९५५२९३८३८८ |
| १४४. | | आर्वी | १ | २. श्री. वाल्मीक रुपराव जाधव-८४०७९५१९६३ |
| १४५. | | समुद्रपूर | १ | ३. श्री. हरीष हरिदास लोंढे-८२०८४८७३०६ |
| १४६. | | सेलू | १ | ४. श्री. भक्तराज हरिभाऊ शिंदे-९३७३१४५१८२ |
| १४७. | वाशिम | मंगरुळपीर | १ | १. डॉ. मोरेश्वर राठोड-९५०३३११९८५ |
| १४८. | | मानोरा | २ | २. श्री. गोपाल किसनराव मुधोळकर-९९२२९७५२५३ |
| १४९. | | रिसोड | २ | ३. श्री. विजय बंडूजी टोंचर-९८२२८०९७९३ |
| १५०. | | वाशिम | २ | ४. श्री. गंगाधर मारोती कांबळे-९५०३८५७९९८ |
| १५१. | अमरावती | अमरावती | ५ | १. श्री. मुकुन्द विजयराव झोलेकर-९५७९५२१९७१ |
| १५२. | | वरुड | १ | २. श्री. प्रज्वल रामदास घाटोड-९७३७७३१५२ |
| १५३. | | चांदूर रेल्वे | १ | ३. श्री. अजय रामहरीपंत गोमकाळे-९८६०६३८९८८ |
| १५४. | | अचलपूर | १३ | ४. श्री. चंद्रशेखर अशोकराव भातकुले-९०९६८५०५३४ |
| १५५. | | मोर्शी | १ | |
| १५६. | | चांदूर बाजार | ३ | |
| १५७. | यवतमाळ | मारेगाव | ३ | १. श्री. रामेश्वर गंगाराम भिसे-९९२२५८७८९२ |
| १५८. | | केळापूर | १ | २. श्री. पांडुरंग रानुजी गदई-७७०९०८३५७४ |
| १५९. | | वणी | ३ | ३. श्री. जोगेश्वर शामराव वाईकर-७७७४८४५५५० |
| १६०. | | यवतमाळ | ३ | ४. श्री. गजानन साहेबराव जाधव-७५१७७९८९४९ |
| १६१. | | राळेगाव | २ | |
| १६२. | | कळंब | ८ | |
| १६३. | | पुसद | १७ | |
| १६४. | | दिग्रस | ४ | |
| १६५. | | घाटंजी | १ | |
| १६६. | | उमरखेड | १ | |
| १६७. | | महागाव | ८ | |
| १६८. | | झरी जामणी | १ | |
| १६९. | | दारव्हा | १ | |
| १७०. | अकोला | अकोला | २ | १. श्री. साईनाथ वामन बाबर-९४२०१०४३६२ |
| १७१. | | पातुर | २ | २. श्री. दिगंबर दत्ता ढाले-९६६५५५५८९४ |
| १७२. | | मुर्तीजापूर | १ | ३. श्री. अमोल जनार्धन नगरधने-९५४५९०१६०० |
| १७३. | | बार्शीटाकळी | १ | ४. श्री. कैलास देवराम कदम-९८११८८०८३९ |
| १७४. | बुलढाणा | खामगाव | २ | १. श्री. समाधान सांडूजी गु-हाळकर-९६८९३३४१७० |
| १७५. | | मेहकर | २१ | २. श्री. दामोदर उकर्डा परकाळे-७०२८२६८९५८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७६. | | जळगाव जामोद | २ | ३. श्री. भानुदास सटवाजी पवार-९९२२२६८०७२ |
| १७७. | | शेगाव | २ | ४. श्री. शंतनु संतोष मुळे-७६२०४७८०८८ |
| १७८. | | चिखली | २ | |
| १७९. | गडचिरोली | वडसा | २ | १. श्री. प्रवीण वामनराव गिरडकर-९९२३४८०५२५ |
| १८०. | | आरमोरी | ३ | २. श्री. रोहन निळकंठ ठाकरे-८७६६४३१०५२ |
| १८१. | | गडचिरोली | ४ | ३. श्री. प्रणव श्रीधर बारसागडे-८००७१०७८५६ |
| १८२. | | चामोर्शी | २ | ४. श्री. प्रणव गडेवार-८५२२०२२००६ |
| १८३. | | धानोरा | २ | |
| १८४. | चंद्रपूर | चंद्रपूर | ४ | १. श्री. कुंदन गजानन कामडी-९३७३७४१६४३ |
| १८५. | | कोरपना | १ | २. श्री. रोहीत खुशाल खेडेकर-८५५१९१४५४३ |
| | | | | ३. श्री. प्रविण आनंदराव गिलबिले-९१६८३६९५९३ |
| | | | | ४. श्री. दिवाकर पुद्धतवार-९३०७२०१५८६ |
| १८६. | ठाणे | कल्याण | ४ | १. श्रीम. रेखा बालाजी मरडे-९३२४३९८२७० |
| १८७. | | उल्हासनगर | ५ | २. डॉ. राहुल काशीनाथ ढाळे-९६१९५९०७९७ |
| १८८. | | अंबरनाथ | ५ | ३. ॲड. गजानन मोहनदास राठोड-९१७२१२७९७७ |
| १८९. | | ठाणे | २ | ४. श्रीम. आरती जग्गु तायडे-९३२१८७२२१६ |
| १९०. | | भिवंडी | २ | |
| १९१. | रायगड | पनवेल | २ | १. श्री. विजय राजेंद्र गलांडे-९३२४३९८२७० |
| १९२. | | महाड | २ | २. डॉ. नथु देऊ राठोड-९४२११६९६०४ |
| १९३. | | कर्जत | १ | ३. श्री. रामचंद्र सायबु वैदु-९८६७७१२३५३ |
| | | | | ४. श्री. सोमा पवार-९४२११६९६०४ |
| १९४. | मुंबई शहर | मुंबई शहर | ६ | १. श्री. दुर्गेश उत्तम चव्हाण- ७६७८०८५०५२ |
| | | | | २. श्री. अनिल विश्वनाथ चौगुले-८१०८३६०५२० |
| | | | | ३. श्री. कृष्णा बाळाप्पा पै-९०८२०३१७१६ |
| | | | | ४. श्री. केवल विनोद गोहर-९३२६१३६१८१ |
| १९५. | मुंबई उपनगर | कुर्ला | ७ | १. श्री. ॲड. महेश सुरेश घुगे-९००४१७६५२७ |
| १९६. | | बोरीवली | ५ | २. श्री. अलका बबन घरत-९९६७८३६१०२ |
| १९७. | | अंधेरी | ५ | ३. श्री. मनीत अंबादास दुर्गम-८८५०८९५००१ |
| | | | | ४. श्री. रुपेश धनाजी करगुटकर-८०९७३०११४३ |
| १९८. | रत्नागिरी | रत्नागिरी | ४ | १. श्री. अशोक यल्लाप्पा हळकुंट्टी-८९७५५९२६३२ |
| १९९. | | दापोली | १ | २. श्री. बाबुशा तमन्ना मोरे-९४२३२९००६९ |
| २००. | | राजापूर | १ | ३. श्री. मुरलीधर दाजी येडमळ-८८३०९२२५७९ |
| | | | | ४. श्री. रमेश भैरु काळे-९२२६२९२९३३ |
| २०१. | पालघर | पालघर | २ | १. श्री. शरद विलास दिवे-८२७५०२०४६० |
| २०२. | | विक्रमगड | ३ | २. श्री. राजेंद्र गौऱ्या केंबळे-९९८७५९९९४६ |
| २०३. | | वसई | ३ | ३. श्री. राजेश मोहिते-९९७००६२७३२ |
| | | | | ४. श्री. व्यंकटेश चव्हाण-८८८८८४५४२६ |
| | | **एकूण** | **९३६** | |